तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांक : २/एनजीसी/एमबीए व्हे./मान्यता/२०१०/ २८६८
दिनांक : 13 JAN 2011

प्रति,
संचालक,
महात्मा फुले इन्स्टिटयुट ऑफ
मॅनेजमेंट अॅण्ड कॉम्प्युटर सायन्स,
अण्णासाहेब मगर कॉलेज, कॅम्पस,
मांजरी रोड, हडपसर, हवेली,
पुणे-४११ ०२८.

Inward No. 347 ... 15-01-2011
Remarks ...
For follow up ...
For information ...
For ...
Director

**(Institute Code 6107)**

विषय : शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून विना-अनुदान तत्वावर व्यवस्थापन संस्थेमध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत बदल करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र.एफ नं.४३१-२७-१५-७१/एमसीपी (एम)९४, दि.१५.०६.२००९.
२. शासन निर्णय, क्रमांक-टिईएम-२००९/(१०३/०९)/तांशि-४, दि.१५.०६.२००९.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून विना अनुदान तत्वावर एमसीए या पदव्यत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत खाली दर्शविल्याप्रमाणे वाढ करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | एमबीए | ६०-१२० |

सदर अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेसाठी आपण रु.१.०० लाख इलाहाबाद बँक शाखा मांजरी, येथे पावती क्र. ८०८२९२ दिनांक ०५.१२.२००९ अन्वये संयुक्त खात्यात ५ वर्षासाठी जमा केलेले आहेत. तसेच १००/- च्या स्टॅम्प पेपरवर शर्ती व अटी मान्य असल्याबाबतचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केलेले आहे. तरी वरील अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतावाढीस व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून या संचालनालयाकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

१. सदर अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेस कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांची संलग्नता घ्यावी लागेल.

२. प्रवेशक्षमता वाढीस दिलेली मंजूरी विना-अनुदान तत्वावर राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे आवर्ती व अनावर्ती अनुदान शासनाकडून मंजूर केले जाणार नाही.

३. विना-अनुदान पदवी अभ्यासक्रमाच्या बाबतीत वेळोवेळी राज्यशासन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद तसेच संचालनालयाकडून करण्यांत आलेल्या/येणा-या नियमांचे, प्रवेश नियमांचे, आरक्षण, शिक्षण शुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४. वाढीव प्रवेशक्षमतेसाठी विद्यापीठ व राज्यशासन यांच्या मानके व प्रमाणके नुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची नियुक्त करण्यांत यावी व त्यांना नियमांप्रमाणे वेतन व भत्ते देण्यात यावेत.

५. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

६. रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट,१९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक आहे.

७. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या **संकेत क्रमाक व पासवर्डद्वारे** शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

(डॉ. सु.का.महाजन)
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

प्रत,

१. मा.सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. मा.कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना माहितीस्तव सादर.
४. कार्यासन क्र.२-अ, मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्र.३, (आय.टी.सेल) यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
६. निवड नस्ती.